प्रकरण सहावे

# समारोप

## प्रकरण ६ वे

# समारोप

<u>प्रस्तावना</u> -

ना. ग. गोरे हे ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी आणि समाजवादी विचारवंत होते. प्रस्तुत प्रबंधामध्ये त्यांच्या राजकीय वाटचालीचा आढावा घेतलेला आहे. लोकशाही समाजवाद प्रस्थापित होण्यासाठी त्यांनी आयुष्यभर अविरत प्रयत्न केले. ना. ग. गोरे हे बुध्दिप्रामाण्यवादी आणि तत्वनिष्ठ होते.

ना. ग. गोरेंचे व्यक्तिमत्व पुरोगामी होते. त्यांच्या जीवनाची वाटचाल ही राजकीय, सामाजिक, साहित्यिक अशी तिहेरी होती. राष्ट्रीय चळवळीत त्यांनी स्वत:ला वाहून घेतले होते. त्याचाही या ठिकाणी अभ्यास करण्यात आलेला आहे. राष्ट्रीय स्वातंत्र्याचा उदघोष करतानाही सामाजिक आर्थिक समतेचं तत्व त्यांनी जोपासले. स्वातंत्र्यप्राप्ती आणि आर्थिक सामाजिक समता प्रस्थापित करणे ही त्यांची तळमळ होती. यासाठी त्यांनी आयुष्यभर अथक प्रयत्न केले.

ना. ग. गोरेंनी तरूण पिढीला जागृत करण्याचेही काम केले. आपल्या साहित्यातून त्यांनी तरूणांच्या विचारांना आर्थिक समतेचा संदेश दिला. त्यांनी अन्यायाविरूध्द संघर्ष केला. त्यासाठी चळवळी केल्या, याचा अभ्यास करण्यात आलेला आहे. त्यांनी चळवळी केल्या त्यामध्ये अहिंसात्मक मार्गाचा अवलंब केलेला होता. लोकशाहीच्या चौकटीत राहून आर्थिक शोषण नाहीसे करणे व समताधिष्ठित समाज निर्माण करणे हे ध्येय त्यांनी बाळगले होते. सामाजिक व आर्थिक समता प्रस्थापित करणे हे त्यांच्या राजकीय वाटचालीतील मूलतत्व होते.

## सारांश :

### प्रकरण पहिले - ना. ग. गोरे चरित्र आणि भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील सहभाग

ना.ग. गोरे चरित्र आणि भारतीय स्वातंत्र्य-चळवळीतील सहभाग या पहिल्या प्रकरणात स्वातंत्र्य चळवळीत केलेल्या त्यांच्या चरित्राचा आणि कार्याचा सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे. ना. ग. गोरे यांच्यावर फुले, आंबेडकर तसेच गांधीजी आणि मार्क्सचा प्रभाव होता. मार्क्सवादातील उणीवा त्यांच्या लक्षात आल्या होत्या. मार्क्सवादातील आर्थिक समतेचा संदेश त्यांना महत्वाचा वाटला. मात्र तो पूर्ण करण्यास गांधीजींचा अहिंसावाद उपयुक्त ठरेल, असे त्यांना वाटत होते. या दोहोंच्या समन्वयावर आधारित ‘लोकसत्ताक समाजवाद’ प्रस्थापित करता येईल अशी त्यांची धारणा आहे. याचा आढावा घेण्यात आला आहे. १

### प्रकरण दुसरे - समाजवादी पक्ष व त्यामधील ना. ग. गोरे यांचा सक्रिय सहभाग.

समाजवादी पक्ष व त्यामधील ना. ग. गोरेंचा सक्रीय सहभाग यांचा अभ्यास दुसऱ्या प्रकरणात करण्यात आला आहे. ना. ग. गोरे हे समाजवादी विचारवंत होते. त्यांचा समाजवाद हा आगरकरांच्या बुध्दिप्रामाण्यवादावर आणि मार्क्सच्या भौतिकवादी आर्थिक समतेवर आधारलेला होता. समाजकारण आणि राजकारण या गोष्टी एकमेकास पूरक असाव्यात असे त्यांचे मत होते. काँग्रेसकडे हळूहळू सनदशीर राजकारणाचा कल आणि तडजोडवादी भूमिका वाढत होती. या भूमिकेस विरोध करून साम्राज्यविरोधी संघर्ष प्रखर करण्यासाठी प्रयत्नशील राहणे आणि समाजवादी विचारसरणीचा प्रचार करणे आणि प्रभाव वाढविणे यासाठीच ना. ग. गोरेंनी आणि

त्यांच्या सहकाऱ्यांनी काँग्रेस समाजवादी पक्षाच्या स्थापनेची योजना आखली. आणि १९३४ मध्ये काँग्रेस अंतर्गत समाजवादी पक्षाची स्थापना केली. काँग्रेस समाजवादी पक्षाच्या संस्थापकांमध्ये ना. ग. गोरेंचा समावेश होता. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९४८ मध्ये ना. ग. गोरेंनी अन्य मित्राबरोबर 'समाजवादी पक्ष' स्थापन केला. महाराष्ट्रात समाजवाद रूजावा म्हणून त्यांनी प्रयत्न केले. त्याचा आढावा या प्रकरणात घेण्यात आला आहे. २

**प्रकरण तिसरे - ना. ग. गोरे यांचे चळवळीतील योगदान**

प्रकरण तीनमध्ये ना. ग. गोरेंनी चळवळीतील केलेल्या कार्याचा अभ्यास करण्यात आला आहे. ना. ग. गोरे अनेक चळवळीमध्ये सहभागी झाले. अन्यायाविरूध्द त्यांनी आवाज उठविला. संयुक्त महाराष्ट्र चळवळ, गोवामुक्ती चळवळ, कामगार चळवळ या आंदोलनामध्ये सहभागी होवून या चळवळी त्यांनी यशस्वी केल्या, याला त्यांनी सत्याग्रह आणि अहिंसात्मक लढ्याची जोड दिली. याचा अभ्यास या प्रकरणात केलेला आहे. ३

**प्रकरण चौथे - प्रजासमाजवादी पक्ष आणि ना. ग. गोरे**

प्रजासमाजवादी पक्ष आणि ना. ग. गोरे याचा अभ्यास चौथ्या प्रकरणात करण्यात आलेला आहे. ना. ग. गोरे हे राजकीय आघाडीवरचे एक प्रभावी नेते होते. त्यांनी पुरोगामी विरोधी पक्षाच्या पायाभरणीचे कार्य केले. १९४८ मध्ये समाजवादी पक्षाच्या स्थापनेत त्यांचा सक्रिय सहभाग होता. १९५२ साली समाजवादी पक्ष व आचार्य कृपलानी यांचा कृषक मजदूर प्रजापक्ष या दोहोत युती होवून प्रजासमाजवादी पक्ष स्थापन झाला. परंतु हा पक्ष फार काळ एकसंघ राहिला नाही. त्यांचे विघटन होवून 'संयुक्त समाजवादी पक्ष' व 'प्रजासमाजवादी पक्ष' असे

दोन गट निर्माण झाले. एस.एम.जोशींनी संयुक्त समाजवादी पक्षाचे नेतृत्व स्विकारले. तर ना. ग. गोरेंनी प्रजासमाजवादी पक्षाचे नेतृत्व स्विकारले.

ना. ग. गोरेंनी समाजवादाची मूल्ये जोपासण्याचा अखेरपर्यंत प्रयत्न केला. समाजवादी पक्षात मतभेद विकोपाला जावून त्यामध्ये फूट पडली. अशा कठीण प्रसंगात ना. ग. गोरेंनी मोठ्या धैर्याने प्रजासमाजवादी पक्षाचे खंबीरपणे नेतृत्व केले आणि पक्षाला वैचारिक पाठबळ देण्याचे काम केले. याचा आढावा या प्रकरणामध्ये घेतला आहे. ४

**प्रकरण पाचवे -| ना. ग. गोरे यांचे राजकीय विचार**

या प्रकरणामध्ये ना. ग. गोरेंच्या राजकीय विचारांचा आढावा घेतलेला आहे. ना. ग. गोरे हे बुध्दिप्रामाण्यवादी होते. ते परिवर्तनवादी आपल्या राजकीय जीवनाचा पाया त्यांनी युवक आंदोलनाद्वारे उभारला. ना. ग. गोरेंनी आपल्या राजकीय कारकीर्दीत तत्वांशी कधी तडजोड केली नाही.

ना. ग. गोरेंनी राजकारण आणि समाजकारण ह्यांची फारकत कधी केली नाही. राजकीय स्वातंत्र्याशिवाय सामाजिक सुधारणेस सामर्थ्य प्राप्त होणार नाही आणि सामाजिक सुधारणेविना राजकीय स्वातंत्र्यासही आशय प्राप्त होणार नाही. ही ना. ग. गोरेंच्या राजकीय वाटचालीत श्रध्दा होती. राजकारणाच्या सर्व घडामोडीत ना. ग. गोरेंची भूमिका ही काँग्रेस समाजवादी पक्ष. समाजवादी पक्ष, प्रजासमाजवादी पक्ष व संयुक्त समाजवादी पक्ष आणि शेवटी प्रजासोशालिस्ट पार्टी या सर्व वाटचालीत सातत्य टिकविणारी होती. त्यांनी आपले सर्व आयुष्य शोषित, दलित, मजूर, शेतकरी, कष्टकरी यांना आर्थिक, सामाजिक, राजकीय न्याय मिळावा यासाठी खर्च केले. याचा आढावा या प्रकरणामध्ये घेतलेला आहे.

ना. ग. गोरे हे समाजवादी विचारसरणीचे नेते होते. समाजामध्ये समाजवादी विचार रूजावेत, वाढावेत यासाठी ते सतत प्रयत्नशील राहिले. लोकशाही समाजवाद निर्माण व्हावा अशी त्यांची धारणा होती. ना. ग. गोरेंचा जन्म एका सुखवस्तु ब्राम्हण कुटुंबात झाला. सुरूवातीला ना. ग. गोरेंनी कुटुंबाप्रमाणे सर्व रूढी, चालीरीती यांचे पालन केले. प्रारंभी, कुटुंबातील इतरांप्रमाणेच ना. ग. गोरे 'सत्यशोधक समाजाचे' कडवे विरोधक होते. नंतर त्यांच्या ज्ञानाच्या कक्षा जशा विकसित झाल्या तशी ना. ग. गोरेंची दृष्टीही बदलत गेली. ते लहान असताना स्पृश्य-अस्पृश्यतेची भावना समाजात जास्त होती. त्याचा त्यांच्या बालमनावर खोल परिणाम झाला. पूर्वापार चालत आलेल्या रूढी, कर्मकांड याविषयी त्यांच्या मनात तिरस्कार, चिड होती.

ना. ग. गोरेंवर आगरकरांच्या तर्कसंगत विचारांचा खूप परिणाम झाला. आगरकरांनी समाजातील दोषांवर प्रहार केले. त्याचा ना. ग. गोरेंच्या मनावर परिणाम झाला व जन्माधिष्ठित विषमता नष्ट झाली पाहिजे असे त्यांना वाटले. आगरकरांच्या सामाजिक सुधारणा या विचारांबद्दल आकर्षण वाटत होते. त्याचबरोबर लोकमान्य टिळकांच्या कृतिशील जीवनाबद्दलही आकर्षण वाटत होते. अस्पृश्यता निवारणासाठी अस्पृश्यांनाच बंडासाठी उभे करणारे आंबेडकर ना. ग. गोरेंना थोर वाटत होते. मार्क्सचे साहित्य त्यांच्या वाचनात आले. तेव्हा मार्क्सच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर पडला. त्यांच्या विचारांची त्यामुळे दिशा बदलली. मार्क्सच्या विचारांना त्यांना बुध्दिवादी बनविले. त्यांच्यामते भारतातील जातिव्यवस्था व चार्तुवर्णा व्यवस्थेचे निर्मूलन झाले पाहिजे. त्यांचे निर्मूलन झाले तर भारतात लोकशाही समाजवाद प्रस्थापित होईल. समाजवादात आर्थिक समतेस मार्क्सने आग्रक्रम दिला. परंतु आपल्या देशातील लोकशाही समाजवादाला समतेचे अधिष्ठान

असलेच पाहिजे. लोकशाही समाजवादाच्या मूळावर ही विषमता आघात करते त्यामुळे लोकशाही समाजवाद प्रस्थापित करताना सामाजिक व आर्थिक समता एकत्र प्रस्थापित केली पाहिजे असे त्यांचे मत होते.

ना. ग. गोरेंवर महात्मा गांधीजींच्या विचारांचा प्रभाव पडला होता. महात्मा गांधींच्या सर्वांगीण पुरोगामी भूमिकेस त्यांनी पाठिंबा दिला आणि त्यांच्या नेतृत्वाखालील झालेल्या स्वातंत्र्यलढयात सहभागी झाले. क्रांतीची सुरूवात स्वत:पासून झाली पाहिजे. हे त्यांचे वचन ना. ग. गोरेंना अर्थपूर्ण वाटत होते. विचार आणि आचार यात एकवाक्यता असली पाहिजे हा गांधी विचाराचा धागा ना. ग. गोरेंना महत्त्वाचा वाटत होता.

ना. ग. गोरे हे स्त्री-मुक्ती समर्थक होते. महाराष्ट्रात स्त्रियांनी सामाजिक क्षेत्रात केलेल्या कार्यांचा त्यांना फार अभिमान वाटत होता. स्त्री-शिक्षण हा ना. ग. गोरेंचा जिव्हाळयाचा विषय होता. ना. ग. गोरेंनी स्त्रियांसाठी राखीव जागांची मागणी केली होती. समाजवादी महिला सभेच्या कार्यकर्त्यांना ते सतत साहाय्य व मार्गदर्शन करीत. ना. ग. गोरेंच्या मते, स्वातंत्र्य चळवळीत, कम्युनिस्ट आणि सोशालिस्ट चळवळीत स्त्रियांनी भाग घेतला हे स्त्री-मुक्तीच्या दृष्टीने फारच महत्त्वाचे होते. त्यांच्यामते, सर्वच पक्षातील स्त्रियांनी महिला प्रबोधनाचे काम केले पाहिजे. समाजवादी पक्षाने स्त्रियांना राजकारणात पुढे आणावे असे त्यांचे मत होते. समाजवादी महिला सभेच्या कामात पुढे त्यांनी बराच रस घेतला. राष्ट्रीय प्रश्नांतील शंकांचे निरसन करून घेण्यास महिला कार्यकर्त्या त्यांच्याकडे जात. त्यांनी स्त्रियांचे आपल्या भाषणामधून प्रबोधन केले. समाजवादी महिला सभेला त्यांनी आपल्या घरातील हॉल दिला. ना. ग. गोरेंच्या मते, परिवर्तनाच्या चळवळीत महिलांनी अग्रेसर राहिले पाहिजे.

आर्थिक आणि सामाजिक समता प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने ना. ग. गोरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी समाजवादी पक्षाच्या स्थापनेत पुढाकार घेतला. समाजवादी समाजरचनेमुळेच दारिद्रयाचे व विषमतेचे निर्मूलन होईल असे त्यांना वाटत होते. समाजवादी चळवळीत ते सहभागी झाले. समाजवादी पक्षातर्फे सुरू केलेल्या अभ्यासवर्गात ना. ग. गोरे तरूणांच्या गटाची बौध्दिके घेत असत त्यांना समाजवादाविषयी माहिती सांगत. यासाठी त्यांनी 'साम्राज्यशाही' हे पुस्तक लिहले. तसेच जयप्रकाशजींच्या 'समाजवादच का?' या पुस्तकाचा मराठी अनुवाद केला व ते पुस्तक विद्यार्थ्यांना वाचावयास दिले. आपल्या समाजातील दारिद्रय आणि सामाजिक व आर्थिक विषमता नष्ट झाली पाहिजे यासाठी झालेल्या चळवळीत त्यांनी भाग घेतला. कार्यकर्त्यांनी वैचारिक खंबीर भूमिका घ्यावी यासाठी ना. ग. गोरे त्यांची बौध्दिके घेत असत. तरूणांच्या मनावर समाजवादी विचार बिंबवण्याचे कार्य ते करत होते. तरूण पिढीला संस्कारीत करण्याचे त्यांच्या विचारांना आचारांना समाजवादी कृतीची जोड देण्याचे काम ना. ग. गोरे यांनी केले. समाजवादी विचारांचे आणि सामाजिक समतेचे समर्थन करणारे वैचारिक साहित्य त्यांनी लिहिले. भारतात समाजवादी विचार रूजावेत म्हणून त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले.

ना. ग. गोरे हे आयुष्यभर सामाजिक समतेसाठी आणि अन्यायाविरूध्द लढले. त्यांनी अनेक चळवळीमध्ये भाग घेतला व त्या चळवळी यशस्वी करून दाखविल्या. ना. ग. गोरे आणि त्यांचे सहकारी भारतीय स्वातंत्र्यासाठी लढले, हैद्राबाद मुक्तीसाठी निजामाशी लढले. तसेच पोर्तुगीजांच्या ताब्यातून गोव्याला मुक्त करण्यासाठी गोवा मुक्ती आंदोलन छेडले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये त्यांनी हिरीरीने भाग घेतला. ना. ग. गोरे कामगार चळवळीमध्ये सामील झाले. त्यांनी कामगारांच्या संघटना उभारून त्यांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला.

त्याचबरोबर कामगारांची वैचारिक भूमिका खंबीर व्हावी यासाठी त्यांची बौध्दिके घेतली. कामगारांमध्ये समाजहिताची भावना जागृत करण्याचे प्रयत्न केले.

ना. ग. गोरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी स्वातंत्र्यलढयात भाग घेऊन स्वातंत्र्य मिळवले. परंतु पुढचा स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचा लढा कठीण होता. तेव्हा समाजवादी पक्षाला खंबीर नेतृत्वाची गरज होती आणि ती ना. ग. गोरे यांनी पूरी केली. समाजवादाच्या वाटचालीत कॉंग्रेस आणि कम्युनिस्ट यांच्यापासून आमची विचासरणी कशी वेगळी आहे हे सामान्य जनतेला पटवून देण्याचे काम त्यांनी केले. अंतर्गत संघर्षानी, तणावांनी समाजवादी शक्ती क्षीण होत गेली. अशावेळी तरूण कार्यकर्त्यांना मार्गदर्शनाची गरज होती. त्याप्रमाणे त्यांचे मनोधैर्य टिकविण्याची फार मोठी आवश्यकता होती. अशा काळात समाजवादी पक्षात फूट पडली. तो काळ सर्व कार्यकर्त्यांना दु:खाचा होता. अशावेळी कार्यकर्त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहाणाऱ्यापैकी ना. ग. गोरे हे होते. त्यावेळी समाजवादी पक्षात फूट पडून त्यातून संयुक्त समाजवादी पक्ष व प्रजासमाजवादी पक्ष निर्माण झाले. या कठीण प्रसंगात प्रजासमाजवादी पक्षाला ना. ग. गोरेंचे नेतृत्व लाभले. त्यांनी प्रजासमाजवादी पक्षाचे अध्यक्षपद स्वीकारले. ना. ग. गोरे प्रजासमाजवादी पक्षाचे अध्यक्ष असताना त्यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी सतत लेखन केले. कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी 'आव्हान आणि आवाहन' आणि 'ऐरणीवरील प्रश्न' हे दोन संग्रह लिहले. त्यांनी आपल्या लेखनातून आर्थिक आणि सामाजिक समतेचा प्रखर पुरस्कार केला. इंदिरा गांधीनी देशात आणीबाणी जाहीर केली त्यावेळी त्याविरोधात ना. ग. गोरे ठामपणे उभे राहिले. ना. ग. गोरेंनी संपूर्ण देशभर छोटया मोठया सभा घेऊन आणीबाणीचा भारतीय लोकशाहीला धोका कसा आहे. याची जाणीव लोकांना

करून दिली. लोकांना निर्भय बनविण्याचे काम त्यांनी केले. ना. ग. गोरेंनी आणीबाणीविरूध्दची भूमिका जनतेत मांडली आणि लोकांचे मनोधैर्य टिकविण्याचे काम केले.

ना. ग. गोरे हे सामाजिक व आर्थिक समतेचे पुरस्कर्ते होते. त्यांचे राजकीय विचार तर्कनिष्ठ होते. त्यांच्या राजकीय वाटचालीतून त्यांचे व्यक्तिमत्व दिसून येते ते परिवर्तनवादी विचारांचे होते. त्यांनी विदयार्थी दशेपासून आपल्या राजकीय जीवनाची वैचारिक साधनसामग्री गोळा केली. त्यांनी आपल्या तत्त्वांशी कधीही तडजोड केली नाही. राजकीय स्वातंत्र्य आणि सामाजिक सुधारणा या दोन्ही गोष्टींना त्यांनी आपल्या राजकीय वाटचालीत महत्व दिले. ना. ग. गोरेंचा राजकीय पिंड हा मार्क्स, गांधीजी, फुले, आंबेडकर हयांच्याा विचारधनातून बनलेला होता. राजकीय स्वातंत्र्यासाठी चळवळ करताना आपण आपल्या समाजातील दोष दूर केले पाहिजेत यासाठी ते सतत प्रयत्नशील राहिले. महाराष्ट्राच्या राजकीय व सामाजिक आणि आर्थिक समतेच्या जडणघडणीमध्ये ना. ग. गोरे यांचा सिंहाचा वाटा आहे. समाजातील विषमता नष्ट करण्यासाठी समाजवादी समाजरचना आवश्यक आहे असे त्यांना वाटत होते. समाजवादी समाजरचना हे ध्येय डोळयासमोर ठेवून त्यांनी आपली राजकीय वाटचाल चालू ठेवली. ना. ग. गोरेंच्या राजकीय व्यक्तिमत्वाच्या मागे साहित्यिक, वैचारिक पाठबळ होते. महाराष्ट्राची उभारणी आर्थिक, सामाजिक समतेवर आधारित करण्यासाठी त्यांनी सतत प्रयत्न केले.

ना. ग. गोरे हे प्रतिभाशाली लेखक होते. त्यांनी आर्थिक राजकीय व सामाजिक समतेला आग्रस्थान दिल्यामुळे ललित लिखान त्यांच्याकडून कमी झाले. परंतु झाले ते सकस झाले. त्यामुळे समाजवादी चळवळीला वैचारिक बैठक व बळ प्राप्त झाले.

समाजवादी आंदोलन अपेक्षेप्रमाणे यशस्वी झाले नाही. या अपयशाचे कारण म्हणजे समाजवादी आंदोलनाला नेतृत्व अपुरे पडले हे आहे. डॉ. लोहियांना खूप दूरचे पाहाण्याची शक्ती होती. पर्यायी विरोधी पक्ष उभा करायचा तर जनसंघाबरोबर समझोता केला पाहिजे ही त्यांची भूमिका चुकीची नव्हती. पण अवेळी फार लवकर त्यांनी ती घेतली होती. त्याचप्रमाणे जयप्रकाश नारायण यांचे चुकले ते एवढेच की भावनाप्रधान होऊन त्यांनी जीवनदान देण्याची गरज नव्हती. पक्षाला बरोबर घेऊन त्या कामात त्यांनी उतरावयास हवे होते चांगली नेते मंडळी अकाली निधन पावली ही बाबही समाजवादाच्या अपयशाची मिमांसा करताना विचारात घ्यावी लागेल.

तर्कनिष्ठ विचार, राजकीय विचारांची सुस्पष्टता, रोखठोक मांडणी, इतके सर्व असलेले ना. ग. गोरे राजकीय प्रश्नाबाबत कधी कधी विसंगत भूमिका घेत. विरोधी पक्ष आणि राज्यकर्ता पक्ष यांच्या कार्यांतील फरक, विरोधी पक्षाची राज्यकर्त्या पक्षाबाबतची भूमिका, या बाबतीत स्वातंत्र्योत्तर काळातील फरक बहुतेक सर्वच समाजवादी पुढाऱ्यांनी समजून घेतला नाही. त्यामुळे त्यांचा वैचारिक गोंधळ झाला. काँग्रेसमधून बाहेर पडल्यावर, किंवा बाहेर पडण्यास भाग पाडल्यानंतरही, काँग्रेस समाजवादी पुढाऱ्यांनी विरोधी पक्ष म्हणून घ्यावयाच्या प्रखर भूमिकेचा विचार केला नाही. त्याला ना. ग. गोरेही अपवाद नाहीत.

ना. ग. गोरेंची सीमा प्रश्नाविषयी विसंगत भूमिका होती. ती बेळगाव-कारवारची असो, कासरगोडची असो, अथवा भारतातील अन्य राज्यांच्या सीमांविषयी असो, ना. ग. गोरेंची एकात्म भारताविषयीची तर्कनिष्ठ भूमिका होती, असे असतानाही, ना. ग. गोरे सीमाप्रश्नांचे पुरस्कर्ते बनून हिरीरीने व सक्रियतेने या लढयात उतरले.

ना. ग. गोरे समाजवादी विचारसरणीचे होते. समाजवादी विचार रूजावेत म्हणून त्यांनी प्रयत्न केले. समाजवादी पक्षाच्या स्थापनेत त्यांनी पुढाकार घेतला. भारतीय समाजवाद काँग्रेसच्या कुशीतच वाढला. सन १९३४ ते १९४८ काँग्रेसच्या अंतर्गत काँग्रेस समाजवादी पक्ष म्हणून तो वावरला. काँग्रेसच्याच नेतृत्वाखाली १९४२ चा लढा त्यांनी गाजवला परंतु या कालखंडात या पक्षाच्या कर्तृत्वाला दुय्यम स्थानच मिळाले. याचे नेतेही सामान्यपणे भारतीय राजकारणात दुय्यम श्रेणीचेचे राहिले. जयप्रकाश नारायण सर्वोदयाकडे वळल्यानंतर आणि डॉ. लोहिया बाहेर पडून अलग वावरू लागल्यानंतर तर, ही नेतृत्वाची उणीव अधिकच भासू लागली. यामुळे कणखर नेतृत्वांतून पक्षाला येणारी संघटनेची धार येऊ शकली नाही. काँग्रेसमध्ये असतांना सहजच ही धार आली नाही व त्यांनतरही येऊ शकली नाही.

समाजवादी पक्ष काँग्रेसमधून बाहेर पडल्यावर पक्षातील नेत्यांनी आपली वैचारिक भूमिका निश्चित केली पाहिजे होती. त्यांनी आपली वैचारिक भूमिका घेऊन काम करावयास हवे होते. पक्षातील वरिष्ठ नेत्यांनी आपली वैचारिक भूमिका निश्चित केली नाही. हे ना. ग. गोरे यांनी मान्य केले. त्यावेळच्या समाजवादी चळवळीचे प्रमुख नेते जयप्रकाश नारायण, आचार्य नरेंद्रदेव, डॉ. लोहिया, अच्युतराव पटवर्धन अशोक मेहता, एस एम, ना. ग. गोरे हे होता. अनेकजणांचा या नेत्यांवर पूर्ण विश्वास होता. त्यांच्यापैकी आचार्य नरेंद्र देव आणि डॉ. लोहिया हे अखेरपर्यंत समाजवादी चळवळीत राहिले. पण जयप्रकाश नारायण यांनी समाजवादी चळवळीला सोडून भूदान चळवळीत सामील झाले. अच्युतराव पटवर्धन राजकारणातून निवृत्त झाले. अशोक मेहता यांनी १९५२ च्या निवडणुकीत कार्यकर्त्यांच्या आकांक्षा खूप वाढविल्या आणि निवडणुकीतील पराभवानंतर ते खचूनच गेले. अखिल भारतीय

पातळीवर समाजवादी चळवळ संघटित करण्याची ज्यांची मुख्य जबाबदारी होती. त्या नेत्यांनी सातत्याने नेतृत्व करण्याऐवजी अन्य मार्ग स्वीकारल्यामुळे समाजवादी पक्ष दुर्बळ झाला. समाजवादी पक्षाला कणखर नेतृत्वाची आवश्यकता असताना ते लाभले नाही. समाजवादी पक्षातील नेत्यांना एकजुटीने पक्षसंघटना करून भारतीय राजकारणाला दिशा देण्याचे प्रयत्न करण्याची त्यांची जबाबदारी होती. परंतु दुर्दैवाने समाजवादी पक्षाला प्रभावी असे नेतृत्व मिळालेच नाही. याच्यामुळे समाजवादी पक्षाची फार मोठी हानी झाली. समाजवादी नेत्यांमध्यें वैचारिक मतभेद झाले. राजकारणात मतभेद होतात परंतु ते टोकाला नेऊन पक्षात फुट पाडणे इष्ट नव्हते. १९६५ साली झालेल्या फाटाफुटीमुळे समाजवादी चळवळीचे फार नुकसान झाले. समाजवादी पक्षातील निष्ठापूर्वक, निरपेक्ष वृत्तीने काम करणाऱ्या सामान्य कार्यकर्त्यांचा फार मोठा मनोभंग या समाजवादी नेत्यांच्यामधील मतभेद व भांडणे यांच्यामुळे झाला. समाजवादी पक्षातील नेत्यांनी पक्षाचे काम एकजुटीने केले नाही हे ना. ग. गोरेंनी मान्य केले नेत्यांनी पक्ष संघटना उभारली नाही. त्यामुळे समाजवादी शक्ती क्षीण झाली. समाजवादी वाटचालीत नेत्यांकडून राजकीय आर्थिक चुका झाल्या. त्यामुळे पक्षाच्या संघटनेची शक्ती कमी झाली.

ट्रेड युनियनची बांधणी करण्यांत समाजवादी पक्ष ना. ग. गोरे बऱ्यापैकी यशस्वी झाले. पण भारतातील अल्पभूधारक शेतकरी, शेतमजूर सर्व क्षेत्रातील संघटीत कामगाराची चळवळ उभारण्यात ना. ग. गोरे यांनी अधिक लक्ष देणे गरजेचे होते. कारण तो बहुसंख्य वर्ग होता. त्याचप्रमाणे या देशातील जातीव्यवस्था केवळ वर्ग - लढा देवून नष्ट होणार नाही तर अल्पसंख्याक समाजाची संघटना बांधून त्यांना अहिंसात्मक सत्याग्रही लढयाची शिकवण देणे गरजेचे होते. यावरती ना. ग. गोरे यांनी भर देणे गरजेचे वाटत होते.

लोकशाही समाजवाद ही विचारधारा सामान्य माणसापर्यंत पोहचविण्यांचे काम ना. ग. गोरे यांनी केले. विशेषता भारतीय समाजवादी चळवळीत आर्थिक समतेबरोबर सामाजिक समतासुध्दा तितकीच महत्वाची आहे हे त्यानी कृती विचारातून दाखवून दिले. समाजवादी चळवळीचे यश अपयश हा वादातील मुद्दा असला तरी लोकशाही समाजवाद भारतात रूजविण्याचे श्रेय समाजवादी चळवळीत द्यावे लागेल. ना. ग. गोरे यांनी समाजवादाची पताका खांद्यावर घेवून आयुष्यभर समाजवाद रूजविण्यास अविरत परिश्रम घेतले.

# संदर्भसूची


| | | | |
|---|---|---|---|
| १. | गोरे ना. ग. | - | 'तिमिरातुनी तेजाकडे' गोरे गौरव संपा. सदानंद वर्दे, श्री. पु. भागवत मौज प्रकाशन, मुंबई पृ. क्र. १३७, १३८, १४०, १४७ |
| २. | प्रधान ग. प्र. | - | 'महाराष्ट्राचे शिल्पकार - ना. ग. गोरे' प्रथमावृत्ती १ मे २००६ प्रकाशक : महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई पृ. क्र. ३९, ४० |
| ३. | प्रधान ग. प्र. | - | 'स्वातंत्र्यसंग्रामाचे महाभारत' प्रकाशन साधना प्रेस, पुणे, पृ. क्र. ४२६, ४२७, ४३० |
| ४. | मधू दंडवते | - | 'नानासाहेबांची राजकीय वाटचाल' गोरे गौरव संपा-सदानंद वर्दे श्री. पु. भागवत मौजे प्रकाशन मुंबई पृ. क्र. २२, २३, २४ |